स्थापना दि. २०/२/१९६० Reg. No. 24087 R. B. L. No.: UBD/MH/654P

# दि आष्टा पीपल्स को-ऑप. बँक लिमिटेड, आष्टा.
# THE ASHTA PEOPLE'S CO-OP. BANK LTD; ASHTA

## सुरक्षित ठेव लॉकर करारनामा

**(हा करारनामा बँक आणि त्यांचे ग्राहक यांचेमध्ये शेडयुलमध्ये नमूद ठिकाणी व नमूद तारखेपासून ग्राहय आहे.)**

**'बँक' या अभिव्यक्तीमध्ये बँक व त्यांचे उत्तराधिकारी, प्रशासक आणि नियुक्त करते समाविष्ट असतील तर 'ग्राहक' या अभिव्यक्तीमध्ये जेव्हा तो ग्राहक असेल तो समाविष्ट असेल.**

(अ) एक किंवा अधिक व्यक्ती , त्याचे/तिचे/त्यांचे वारस (अनेक वारस), कार्यकारी (अनेक कार्यकारी), प्रशासक (अनेक प्रशासक) आणि कायदेशीर प्रतिनीधी (अनेक प्रतिनीधी)

(ब) एक मालकी (प्रोप्रायटर) फर्म, तीचे मालक, त्याचे/तिचे/त्यांचे वारस (अनेक वारस), कार्यकारी (अनेक कार्यकारी), प्रशासक (अनेक प्रशासक) आणि कायदेशीर प्रतिनीधी (अनेक प्रतिनीधी)

(क) एक भागीदारी संस्था, अशी संस्था (फर्म) तिचा उत्तराधिकारी, अशा फर्मचे भागीदार, वाचलेले आणि या फर्ममधून वाचलेले भागीदार व त्यांचे वारस (अनेक वारस), कार्यकारी (अनेक कार्यकारी), प्रशासक (अनेक प्रशासक) आणि कायदेशीर प्रतिनीधी (अनेक प्रतिनीधी प्रत्येकी)

(ड) एक हिंदू अविभक्त कुटुंब (HUF), त्याचे सदस्य आणि यातून वाचलेले, कायदेशिर वारस (अनेक वारस), कार्यकारी (अनेक कार्यकारी), प्रशासक (अनेक प्रशासक) आणि कायदेशीर प्रतिनीधी(अनेक प्रतिनीधी) आणि

(इ) एक मर्यादित कंपनी व तिचे उत्तराधिकारी

(बँक आणि ग्राहक प्रत्येकाला ''पक्ष'' आणि एकत्रितपणे ''पक्ष'' म्हणूनच संबोधले जाईल)

**जेथे :**

(अ) सुरक्षित ठेव लॉकर सुविधेचा लाभ घेऊ इच्छीणाऱ्या ग्राहकाने या सुविधेसाठी बँकेकडे संपर्क साधला आहे.

(ब) बँक काही अटी व शर्तीस अधिन राहून ग्राहकाला सुरक्षित ठेव लॉकर सुविधा प्रदान करण्यास सहमत आहे; आणि

(क) दोन्ही पक्षांनी या संदर्भात त्यांचे समजूतीने हा करारनामा करण्याचा निर्णय घेतला आहे.

**<u>हे खालीलप्रमाणे दोन्ही पक्षांना व दोन्ही पक्षांमध्ये सहमती आहे.</u>**

**१.लॉकर परवाना :**

१.१ परवाना धारक म्हणून बँक याद्वारे ग्राहकाला परवाना धारक म्हणून सुरक्षित ठेव लॉकर वापरण्यास परवाना मंजूर करते. ज्याचा अधिकतम तपशील या कराराच्या अनुसुचीमध्ये नमूद अटी व शर्तीमध्ये वर्णन केला आहे.(यापुढे लॉकर म्हणून संदर्भित)

१.२ ग्राहक याद्वारे अनुसुचीमध्ये(शेडयूल) नमूद भाडेरक्कम (भाडे) निर्दिष्ट केल्यानुसार शुल्कापोटी दिलेला परवाना स्वीकारतो.

**१.३ लॉकर वापरण्याचा परवाना पुढीलप्रमाणे देण्यात आला आहे :**

(अ) वैयक्तिक आणि ग्राहकाच्या स्वतःच्या वापरासाठी आणि ग्राहकाव्यतिरीक्त इतर कोणत्याही व्यक्तीच्या वापरासाठी नाही.

(ब) अहस्तांतरणीय

(क) केवळ दागिने आणि दस्तऐवज यांसारखया मौल्यवान वस्तू साठविण्यासारखया वैध हेतूंसाठी परंतू कोणतीही रोख किंवा चलन साठविण्यासाठी नाही.

(ड) खालील वस्तू साठविता येणार नाही :

(i) शस्त्र, शस्त्रे, स्फोटके, औषधे आणि /किंवा प्रतिबंधित सामग्री; आणि/किंवा

(ii) कोणतीही नाशवंत सामग्री आणि/किंवा किरणोत्सर्गी सामग्री आणि/किंवा कोणतेही अवैध पदार्थ; आणि/किंवा

(iii) कोणतीही सामग्री जी बँकेला किंवा तिच्या कोणत्याही ग्राहकांना कोणताही धोका किंवा उपद्रव निर्माण करू शकते.

१.४ या काराराअंतर्गत निर्दिष्ट केलेल्या अटी व शर्तीनुसार लॉकरमध्ये प्रवेश करण्याच्या आणि वापरण्याच्या अधिकाराशिवाय ग्राहकाला लॉकरमध्ये कोणताही अधिकार किंवा मालमत्ता असणार नाही.

**१.५ ग्राहकाला खालीलप्रमाणे लॉकर वापरण्याची परवानगी दिली जाईल :**

(अ) बँकेच्या कामकाजाच्या दिवशी लॉकर ऑपरेशनसाठी बँकेने वेळोवेळी सुचित केलेल्या विशीष्ट वेळेत आणि अशी सुचना नसताना पण बँकेच्या कामकाजाच्या वेळेत ऑपरेटींग करता येईल. तथापी पूर, दंगल, कर्फ्यू, लॉकडाऊन,

इ.सारख्या कोणत्याही कारणास्तव बँकेला तिच्या नियंत्रणाबाहेर काम करता येत नसेल तर लॉकर ऑपरेट करणेस परवानगी देण्याचे बँकेस कोणतेही बंधन राहणार नाही.

**(ब)** बँकेकडे लॉकर ऑपरेशनकरीता चालू असलेल्या सर्व प्रकारच्या सिस्टीममध्ये ग्राहकाद्वारे लॉकर ऑपरेशनकरीता नोंद केलेनंतर; आणि

**(क)** बँकेने मागणी केल्यास ग्राहकाने ओळखीचा पुरावा प्रदान केल्यानंतर.

**२. ग्राहकाचे उपक्रम आणि दायित्वे –**

**२.१ ग्राहकांची दायित्वे खालीलप्रमाणे :**

**(अ)** लॉकरचा वापर फक्त त्याच उद्देश्यासाठी करणेचा आहे जो कायदा व कायद्यातील नियमांनुसार लागू व बंधनकारक आहे;

**(ब)** लॉकर ऑपरेशनसाठी बँक वेळोवेळी स्विकारेल त्या अटी व नियमांचे पालन करणे;

**(क)** लॉकरचा अनाधिकृत वापर वाचविण्यासाठी लॉकर उघडण्यासाठी बँकेने प्रदान केलेली किल्ली, पासवर्ड किंवा इतर कोणतीही ओळख यंत्रणा सुरक्षित ठिकाणी ठेवावी, ती इतर कोणत्याही व्यक्तीसोबत शेअर न करणे आणि ती इतर कोणत्याही व्यक्तीच्या हातात पडू न देणे.

**(ड)** लॉकर ऑपरेट करणेसाठी बँकेने प्रदान केलेली चावी, पासवर्ड अथवा इतर ओळख यंत्रणा वापरणेचे आहे;

**(ई)** बँकेने लॉकर ऑपरेट करणेसाठी दिलेल्या चावीची किंवा इतर कोणत्याही ओळख यंत्रणेची प्रत बनवू/तयार करू नये.

**(फ)** बँकेने लॉकर ऑपरेट करणेसाठी प्रदान केलेली चावी, पासवर्ड अथवा इतर कोणतीही ओळख यंत्रणा हरविलेस त्वरीत बँकेस कळविणे;

**(ग)** बँकेने लॉकर ऑपरेट करणेसाठी प्रदान केलेली चावी, पासवर्ड अथवा इतर कोणतीही ओळख यंत्रणा हरविली म्हणून बँकेस कळविलेनंतर परत सापडलेस बँकेकडे तात्काळ जमा करणे;

**(ह) बँकेने आपले लॉकर करीता केलेला सर्व खर्च व भाडे बँकेस दयावे :**

१. लॉकर बदललेस अथवा किल्ली हरविलेनंतर केलेल्या दुरूस्तीचा खर्च देणे

२. या करारानुसार लॉकर ब्रेक ओपन केले असलेस, त्याचा सर्व खर्च देणे;

३. पत्ता बदलला असलेस नविन पत्ता, फोन नंबर, ईमेलआयडी, मोबाईल नंबर इ.तपशिल बँकेस कळविणे.

**३. बँकेचे अधिकार**

**३.१ बँकेला खालील गोष्टींचा अधिकार असेल –**

**(अ)** लॉकर संबंधी बँकेचे देय भाडे आणि इतर कोणताही खर्च रक्कम ग्राहकाकडून येणे असलेस अथवा त्याने ते भरले नसलेस ग्राहकाचे खात्यातून नावे टाकून वसूल करणे.

**(ब)** लॉकर ऑपरेशनकरीता प्रवेश नाकारणे

१. लॉकर भाडे थकीत असलेस आणि

२. लॉकरमध्ये प्रवेश मिळविणे वेळी बँकेने मागणी केलेला ग्राहक ओळखीचा पुरावा प्रदान करण्यात अयशस्वी ठरल्यास.

**३.२ परवाना रद्द करणे**

३.२.१ ग्राहकाने या कराराचा भंग अथवा काही धोकाधडी केल्यास, किंवा बँकेचे मते ग्राहक सहकार्य करत नसलेस अथवा या करारातील अटी व नियमांचे पालन करत नसलेस बँक या ग्राहकाचा लॉकर परवाना रद्द करेल. परंतू बँकेकडून सदर ग्राहकास ३ महिन्यापुर्वी रजिस्टर्ड पोस्ट अथवा स्पीड पोस्टाने लेखी नोटीस(टर्मिनेशन नोटीस) देणे आवश्यक आहे अथवा त्याचे ईमेल आयडी असलेस त्यावरती मेल पाठविणे किंवा मोबाईल नंबर उपलब्ध असलेस एसएमएस/व्हॉटसॲप करणे पाठविणे आवश्यक आहे.

३.२.२ सदर लेखी नोटीस(टर्मिनेशन नोटीस) मध्ये नमूद कालावधी संपण्यापुर्वी परवानाधारक बँकेस भेट देवून लॉकर रिकामा करून लॉकरची किल्ली, पासवर्ड किंवा बँकेने प्रदान केलेली इतर ओळख यंत्रणा व कागदपत्रे बँकेकडे हस्तांतर केलेस बँक परवाना रद्द करेल.

**३.३ लॉकर ब्रेक करणे आणि त्यातील सामग्री हाताळणे–**

३.३.१ खाली नमूद एक किंवा अनेक घटना घडत असलेस या करारातील तरतूदीनूसार, बँकेचे अंतर्गत लॉकर धोरण, कार्यपध्दती आणि सर्व संबंधित लागू कायदे, नियम व तरतूदींनुसार लॉकर ब्रेक करणेचा अधिकार बँकेस आहे.

**अ)** वरील नियम क्र.३.२.१ नुसार ग्राहकास टर्मिनेशन नोटीस मिळालेनंतर आणि नोटीस कालावधी संपलेनंतरही लॉकरधारकाने लॉकर रिकामे करून बँकेचे ताब्यात न दिलेस,

**ब)** सलग ३ वर्षे भाडे न भरलेस,

**क)** ७ वर्षे किंवा त्यापेक्षा जास्त कालावधीत लॉकरधारकाने लॉकर ऑपरेट न केलेस आणि ग्राहक शोधणे अशक्य झालेस. (जरी लॉकर भाडे भरले असले तरीही)

३.३.२ लॉकर ब्रेक करण्याचे अधिकार वापरण्यापुर्वी (ब्रेक ओपन नोटिस देणे) बँक ग्राहकाला नोंदणीकृत रजिस्टर पोस्टाने ३ महिन्यांत परवाना रद्द मुदत नोटिस देईल (वरील कलम ३.२.१ अंतर्गत परवाना रद्द मुदत नोटीस) पाठवेल, अथवा त्याचे ईमेल आयडी असलेस त्यावरती मेल पाठविणे किंवा मोबाईल नंबर उपलब्ध असलेस एसएमएस/व्हॉटसअॅप करणे पाठविणे आवश्यक आहे.

३.३.३ असे असले तरीही बँक लॉकर ब्रेक करणेपुर्वी खातेधाराचे मोबाईलवर एसएमएस पाठविणे, वैयक्तिक संदेशवाहक पाठवून अथवा त्याचे लॅण्डलाईन/मोबाईल वर फोन कॉल करून ग्राहकाशी संपर्क साधण्यासाठी सर्व ते शक्य प्रयत्न करेल.

३.३.४ बँकेने पाठविलेल्या पूर्व कल्पना मुदत समाप्ती नोटिस आणि ब्रेक ओपन नोटिस ग्राहकांपर्यंत न पोहोचता परत आलेस आणि वर नमूद ३.३.२ आणि ३.३.३ अंतर्गत नमूद केलेल्या गोष्टींसह वाजवी प्रयत्न करूनही ग्राहक शोधता येत नसलेस बँक ब्रेक ओपन करणेच्या कार्यवाहीकरीता नोटिस मुदत ३ महिने पुर्ण झालेल्या लॉकरधारकांचे नावांसह त्याने बँकेस पुरविलेल्या पत्त्याचे परिसरात अथवा नंतर बदल कळविलेल्या पत्त्याचे परिसरातील दैनिक लोकल न्यूजपेपरमध्ये त्यांचे मातृभाषेमध्ये व इंग्रजीमध्ये नोटिस देईल.

३.३.५ लॉकर ब्रेक ओपन प्रक्रिया बँकेचे २ अधिकारी आणि बाहेरिल २ साक्षीदार यांचे हजेरीत केले जाईल. तसेच इलेक्ट्रॉनिक पध्दतीच्या लॉकर संदर्भात 'व्हॉल्ट अॅडमिनीस्ट्रेटर' चे पासवर्डचा वापर करून लॉकर ब्रेक केले जाईल व त्याचा संपुर्ण ऑडिट ट्रेल केला जाईल.

३.३.६ बँक वर नमूद प्रक्रियेचे पालन करून ब्रेक ओपन केलेल्या लॉकर मधील साहित्याची यादी केली जाईल. तसेच सदर साहित्याचे बँकेच्या अधिकृत मूल्यांकनकार यांचेमार्फत मूल्यांकन करेल आणि सदर यादीसह सर्व साहित्य बँक आपल्या ताब्यात घेवून अग्निरोधक तिजोरीमध्ये सीलबंद पाकिटात ठेवले जाईल.

३.३.७ याव्यतिरीक्त बँक इनव्हेंटरी असेसमेंटसह ब्रेक ओपन प्रक्रियेचा व्हिडीओ देखील रेकॉर्ड करेल आणि भविष्यातील कोणताही विवाद अथवा न्यायालयीन खटल्याच्या बाबतीत पुरावा म्हणून प्रदान करणेसाठी सुरक्षित ठेवेल आणि जतन करेल.

३.३.८ लॉकर रजिस्टरशिवाय लॉकर ब्रेक ओपन केलेबद्दल आरबीआय ने वेळोवेळी जारी केलेल्या सायबर सिक्युरिटी फ्रेमवर्कचे पालन करणाया सीबीएस सिस्टीममध्ये ब्रेक ओपन नोंद करणे आवश्यक आहे.

३.३.९ वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे ब्रेक ओपन केलेल्या लॉकरमधील यादीप्रमाणे साहित्याची विल्हेवाट सार्वजनिक लिलावत विक्रीद्वारे केली जाईल. तद्नंतर सदर विक्रीतून आलेल्या रक्कमेतून प्रथमतः ग्राहकाकडून बँकेची देय असणारी सर्व रक्कम उदा.थकीत लॉकर भाडे, ब्रेक ओपन चार्जेस आणि इतर सर्व प्रकारची देय रक्कम इ.कपात करून घेतली जाईल व उर्वरीत रक्कम ग्राहकाला परत केली जाईल किंवा ग्राहकाच्या आदेशाकरीता विल्हेवाट लावणेसाठी ठेवली जाईल.

३.३.१० लॉकर साहित्याची सार्वजनिक लिलाव करणेपुर्वी, पोस्ट/स्पीड पोस्टद्वारे लेखी नोटीसद्वारे आणि ईमेलद्वारे(जो आयडी बँकेकडे उपलब्ध असेल त्यावर मेल) किंवा एसएमएसद्वारे/व्हाटस्अॅपवर(जो नंबर बँकेकडे उपलब्ध असेल त्यावर) ३ महिन्यांपुर्वी कळविणेचे आहे ज्यामध्ये ग्राहकाची थकबाकी वसुलीसाठी सामग्रीचा लिलाव करण्याच्या हेतूबद्दल उल्लेख करून सदर नोटीसी सोबत लॉकर सामग्रीची यादीची एक प्रत देवून लिलावाची तारीख, ठिकाण व वेळ कळविली जाईल.

**४. जबाबदारी व दायित्वातून बँकेची मुक्तता**

**४.१** पाऊस, आग, पूर, भूकंप, दिवाबत्ती, नागरी अशांतता किंवा गोंधळ, दंगल किंवा कोणत्याही दहशतवादी हल्ल्यामुळे किंवा इतर कोणत्याही तत्सम कारणांमुळे लॉकरमधील सामग्री खराब झाल्यास किंवा नुकसान झाल्यास बँक कोणत्याही परिस्थितीत जबाबदार राहणार नाही.

**४.२** ग्राहकाच्या कोणत्याही चुकीमुळे किंवा निष्काळजीपणामुळे उद्भवलेल्या कोणत्याही कृतीमुळे लॉकर सामग्रीचे कोणतेही

नुकसान झाल्यास त्यास बँक जबाबदार राहणार नाही.

४.३ सदर करारातील तरतूदीनुसार लॉकर खाते ब्रेक ओपन केलेनंतर त्यातील सामग्रीचे कोणतेही नुकसान किंवा लॉकरचे सामग्रीच्या नुकसानासह ग्राहकाचे कोणत्याही खर्चासाठी, तोटयासाठी किंवा दायित्वासाठी बँक जबाबदार राहणार नाही.

४.४ वरीलप्रमाणे काहीही असलेतरी लॉकरवरील बँकेचे उत्तरदायित्व नेहमी लागू कायदे आणि नियमांनुसार मर्यादेच्या अधिन असेल.

४.५ बँकेमार्फत लॉकरमधील सामग्रीचा कोणत्याही प्रकारचा विमा उतरविला जाणार नाही. कोणत्याही जोखमीच्या विरूध्द लॉकरमधील सामग्रीचा विमा उतरविण्याचे कोणतेही दायित्व बँकेवर असणार नाही.

**५. वारसनोंद सुविधा**

बँकींग रेग्युलेशन अॅक्ट १९४९ च्या कलम **45ZC** आणि **45ZE** नुसार सेफ कस्टडी/ लॉकरचे नामांकन केले जाऊ शकते. लॉकर धारकाचा मृत्यू झाल्यास नामनिर्देशित व्यक्तीला लॉकरमधील शिल्लक वस्तू मिळतील. परंतू सदर वारसाने इतर सर्व सरळ वारसांचे संमत्तीने नुकसान भरपाई करार व आवश्यक कागदपत्रांसह पूर्तता करणे आवश्यक आहे.

**६. कायदा आणि अधिकार क्षेत्र**

हा करार भारतीय कायद्याचे अधिन आहे आणि त्यातून निर्माण होणाया सर्व बाबी ज्या ठिकाणी लॉकर सुविधेचा लाभ घेतला जाईल त्या ठिकाणच्या न्यायालयांच्या अधिकार क्षेत्राचे अधिन असतील.

**शेड्युल (SCHEDULE)**

| | | |
|---|---|---|
| **ठिकाण–** | | **दिनांक** |
| **१. करारत भाग घेतलेले पक्ष** | | |
| १ (अ) | **बँक** | महाराष्ट्र राज्य सहकारी संस्था कायदा, १९६० अंतर्गत स्थापना झालेली **'दि आष्टा पीपल्स को–ऑपरेटिव्ह बँक लि., आष्टा''** नोंदणी क्र. २४०८७, नोंदणी दि. २०/०२/१९६० आणि परवाना अंतर्गत बँकींग नियमन कायदा १९४९ परवाना नं. R.B.L. No. UBD/MH/654P |
| | **शाखा** | |
| **१ (ब)** | **ग्राहक** | ग्राहक क्र: |
| | **१ (फोटो)** | नांव |
| | | पत्ता : |
| | | ई–मेल आयडी : |
| | | मोबाईल / टेलिफोन नंबर : |
| | **२ (फोटो)** | ग्राहक क्र: |
| | | नांव : |
| | | पत्ता : |
| | | ई–मेल आयडी : |
| | | मोबाईल / टेलिफोन नंबर : |
| | **३ (फोटो)** | ग्राहक क्र: |
| | | नांव : |
| | | पत्ता : |
| | | ई–मेल आयडी : |
| | | मोबाईल / टेलिफोन नंबर : |

| | | |
|---|---|---|
| २ | लॉकरचे वर्णन | लॉकर नंबर : लॉकर खाते नंबर :<br>लॉकर किल्ली नंबर : |
| ३ | प्रतिवर्ष लॉकर भाडे | रुपये (अकांत) :<br>रुपये (अक्षरात) :<br>(वेळोवेळी सुधारित केले जाऊ शकते)<br>(आगाऊ देय) |
| ४ | परवान्याचा कालावधी | या कराराच्या तारखेपासून १ वर्ष तद्नंतर वर्ष संपताच पुढील कालावधीसाठी हा करार वाढविला जाईल, जोपर्यंत समाप्त केला जात नाही तोपर्यंत, |
| ५ | लॉकर ऑपरेटिंग पध्दत | |
| ६ | इतर अटी | |

| ग्राहक खातेदारांकरिता | | | |
|---|---|---|---|
| | १ | २ | ३ |
| सही | | | |
| नांव | | | |
| पदनाम / क्षमता | | | |
| | (* ग्राहक अवैयक्तिक अथवा व्यक्तिगत सह्यांचे अधिकार नसलेले ग्राहकांकरिता) | | |

## ओळख देणारा व साक्षीदार, ज्यांचे साक्षीने करार अंमलात आणला जाईल

| अ.नं. | खातेदाराचे नांव | पत्ता | सही |
|---|---|---|---|
| १ | | | |
| २ | | | |

*** बँक वापराकरिता ***

**दि आष्टा पीपल्स को-ऑपरेटिव्ह बँक लि., आष्टा,**

**ता. वाळवा, जि. सांगली, शाखा :** ..........................................

अधिकाऱ्याचे नांव आणि पद : ..........................................

..........................................

सही ..........................................

(सहीचा नमुना व लॉकर भाडे)

## दि आष्टा पीपल्स को-ऑपरेटिव्ह बँक लि., आष्टा.

खाते क्रमांक : लॉकर वर्ग : क्रमांक :

खातेदाराचे पूर्ण नांव : ______

व्यवसाय ______ पत्ता : ______

खातेदाराचा सहीचा नमुना : ______

मुखत्याराचे पूर्ण नांव : ______

व्यवसाय ______ पत्ता : ______

मुखत्याराचा सहीचा नमुना ______

सांकेतिक शब्द, इत्यादी

कायम केले

खातेदाराची सही ______

ठिकाण : कायम केले

दिनांक : अधिकाऱ्याची सही/-

किल्ली पोच

श्री व्यवस्थापक/

## दि आष्टा पीपल्स को-ऑपरेटिव्ह बँक लि., आष्टा.

आपल्याकडून लॉकर वर्ग............क्रमांक.............. चा लॉकर भाड्याने घेतला आहे. त्याची किल्ली मला आज रोजी आपणांकडून मिळाली आहे.

ठिकाण :

दिनांक ______ खातेदाराची सही

श्री. ______

यांनी लॉकर वर्ग...................क्रमांक...............................चा लॉकर आज रोजी रिकामा करुन दिला आहे. त्या लॉकरची किल्ली त्यांचेकडून आज रोजी बँकेच्या ताब्यात मिळाली.

ठिकाण

दिनांक : ______ अधिकाऱ्याची सही